**महाराष्ट्र जनशक्ती** | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : १६९ वे दिनांक : १४/०६/२०२६ वार : रविवार

## महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र ओळख! आता मिळणार 'शेतकरी'चा अधिकृत दर्जा




**मुंबई :** महाराष्ट्रातील लाखो महिला शेतकऱ्यांसाठी एक ऐतिहासिक आणि दिलासादायक निर्णय घेण्याच्या तयारीत राज्य सरकार आहे. शेतीत प्रत्यक्ष राबणाऱ्या, पण जमिनीची मालकी नसल्यामुळे अनेक सरकारी योजनांपासून वंचित राहणाऱ्या महिलांना आता स्वतंत्र 'शेतकरी' म्हणून वैधानिक मान्यता मिळणार आहे. यासाठी राज्य सरकार 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६' पावसाळी अधिवेशनात सादर करण्याची तयारी करत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी झालेल्या महत्त्वाच्या बैठकीत या विधेयकाच्या मसुद्यावर चर्चा करण्यात आली. महिला शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण, आर्थिक स्वावलंबन आणि कृषी क्षेत्रातील समान सहभाग सुनिश्चित करण्यासाठी सर्वसमावेशक कायदा तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. बैठकीत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी एक महत्त्वाचा आकडा समोर ठेवला. राज्यातील कृषी क्षेत्रात ८१ टक्क्यांहून अधिक महिलांचा प्रत्यक्ष सहभाग आहे. मात्र, बहुतांश सरकारी कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी जमिनीची मालकी आवश्यक असल्याने हजारो महिला या योजनांपासून दूर राहतात. विशेषतः कुटुंबातील पुरुषांच्या नावावर जमीन असलेल्या महिला, सामुदायिक जमिनीवर शेती करणाऱ्या महिला, तसेच पशुपालन, मत्स्यव्यवसाय, कुक्कुटपालन, वनउपज संकलन यांसारख्या कृषीपूरक व्यवसायात कार्यरत महिलांना अधिकृतपणे 'शेतकरी' मानले जात नाही. यामुळे त्यांना कर्ज, अनुदान, विमा आणि इतर सुविधा मिळण्यात अडचणी येतात. या विधेयकाचा आवाका केवळ पारंपरिक शेतीपुरता मर्यादित राहणार नाही. पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मधमाशीपालन, मत्स्यव्यवसाय, रेशीम उद्योग, बागायती, फुलशेती, मशरूम उत्पादन, कृषी वनीकरण आणि वनउपज संकलन यांसारख्या क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या महिलांचाही समावेश होणार आहे. याशिवाय भूमिहीन महिला शेतकरी, भाडेकरू शेतकरी, शेतमजूर, चराई व्यवसाय करणाऱ्या महिला आणि स्थलांतरित कृषी कामगार महिलांनाही या कायद्याअंतर्गत संरक्षण आणि लाभ मिळण्याची शक्यता आहे. सरकार महिला शेतकऱ्यांचा स्वतंत्र डिजिटल डेटाबेस तयार करण्याच्या दिशेनेही पाऊल उचलणार आहे. या माध्यमातून पात्र महिलांना थेट सरकारी योजनांचा लाभ मिळेल. यामध्ये कर्ज योजना, कृषी अनुदान, बियाणे, खते, पीक विमा, कृषी सल्ला सेवा, बाजारपेठ सुविधा, वाहतूक, साठवणूक आणि सामाजिक सुरक्षा योजनांचा समावेश असेल. संपूर्ण प्रक्रिया डिजिटल पद्धतीने पारदर्शक आणि प्रभावी करण्याचा सरकारचा मानस आहे. महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी राज्य सरकार स्वतंत्र 'महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी निधी' स्थापन करण्याचाही विचार करत आहे. या निधीतून महिला शेतकऱ्यांना आर्थिक मदत, प्रशिक्षण, उद्योजकता विकास आणि कृषी क्षेत्रातील नव्या संधी उपलब्ध करून देण्याची योजना आहे. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी गाव, तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावर स्वतंत्र यंत्रणा उभारली जाणार आहे. तसेच या कायद्याच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती स्थापन करण्याचाही प्रस्ताव आहे. ही समिती नियमितपणे कायद्याचा आढावा घेईल आणि महिला शेतकऱ्यांपर्यंत योजनांचा लाभ प्रत्यक्ष पोहोचतो आहे की नाही, यावर लक्ष ठेवेल. राज्यातील लाखो महिला शेतीची जबाबदारी सांभाळत असल्या तरी त्यांना अधिकृत ओळख मिळत नव्हती. त्यामुळे हे विधेयक केवळ एक कायदा नसून ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणाचा नवा अध्याय ठरू शकतो. महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र ओळख, आर्थिक हक्क आणि सरकारी योजनांमध्ये समान प्रवेश देण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. पावसाळी अधिवेशनात हे विधेयक मंजूर झाल्यास महाराष्ट्र देशातील महिला शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र कायदा करणाऱ्या अग्रगण्य राज्यांपैकी एक ठरू शकतो.

## 'सक्षमच्या लहान भावामुळे...' आंचलचा मोठा दावा; हत्या प्रकरणात खळबळ



**नांदेड :** प्रेमासाठी कुटुंबियांविरुद्ध बंड पुकारत, प्रियकराच्या मृतदेहाशी लग्न करून त्याच्याच घरी राहण्याचा निर्णय घेणाऱ्या नांदेडमधील आंचल मामिडवार हिच्या प्रकरणाला आता अत्यंत धक्कादायक वळण मिळाले आहे. "आंचल बहाणा करून घर सोडून निघून गेली," या सासूच्या आरोपांनंतर आंचलने स्वतः प्रसारमाध्यमांसमोर येत मौन सोडले आहे. "प्रियकर सक्षम ताटे याच्या लहान भावाने माझ्याशी अत्यंत गैरवर्तन केले; ही बाब घरात सांगूनही विश्वास न ठेवल्याने मी पोलिसांच्या संरक्षणात घर सोडले," असा खळबळजनक आरोप आंचलने केला आहे.

6 महिन्यांपूर्वी सक्षम ताटे याची आंचलच्या कुटुंबियांनी गोळ्या घालून आणि डोक्यात फरशी मारून निर्घृण हत्या केली होती. या हत्येनंतर आंचलने सर्वांसमोर सक्षमच्या मृतदेहाशी लग्न केले होते आणि ती सासू संगीता ताटे यांच्यासोबतच राहत होती. मात्र, नुकतेच आंचल तीन महिन्यात घर सोडून गेल्याचे सक्षमची आई संगीता ताटे यांनी एका मुलाखतीत सांगितले.

त्या म्हणाल्या होत्या, "सक्षमच्या जाण्यानंतर आंचल म्हणाली होती की, मीच आता तुमचा मुलगा आहे आणि तुमची काळजी घेईन. ती 3 महिने सोबत राहिली. पण एक दिवस आजीची तब्येत खराब असल्याचे सांगून ती माहेरी गेली. मी स्वतः तिला सोडून आले, पण त्यानंतर ती कधीच परत आली नाही. आता धाकटा मुलगा नाशिकला शिकत असल्याने मी घरात एकटीच राहिले आहे."

सासूने केलेल्या या दाव्यांनंतर सोशल मीडियावर आंचलवर प्रचंड टीका आणि ट्रोलिंग सुरू झाले होते. यावर अत्यंत संतप्त होत आंचलने ताटे कुटुंबावर गंभीर आरोप केले आहेत. आंचल म्हणाली, "मी आजीचे कारण काढून पळून आलेली नाही. सक्षमचा लहान भाऊ माझ्याशी सतत गैरवर्तन करत होता. हा अत्यंत गंभीर प्रकार मी सक्षमच्या कुटुंबाला (सासूला) सांगितला, मात्र त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला नाही."

आंचल म्हणाली, "जर सक्षमच्या कुटुंबियांचा माझ्यावर विश्वास नसेल, तर उद्या घरात काही चुकीचे किंवा अघटित घडले तर त्याला जबाबदार कोण? म्हणूनच मी कोणाचीही फसवणूक न करता, पोलिसांना पूर्ण कल्पना देऊन घर सोडले. पोलीस कर्मचाऱ्यांनी स्वतः सोबत येऊन मला माझ्या वडिलांच्या घरी सोडले आहे आणि सध्या मी तिथेच सुरक्षित आहे." याच प्रवासात सक्षमच्या वडिलांचा मृत्यू हा आजारपणामुळे झाल्याचेही आंचलने स्पष्ट केले

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क | एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी | कलर प्रिंट स्कॅनिंग | झेरॉक्स
स्पायरल बायंडिग | लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

## गोरीला

गोरीला माकड
संपूर्ण शाकाहारी
फळं, पानं, बांबूची
करतो सकाळी न्याहारी

रंगाने काळा काळा
चपटे त्याचे नाक
डुलत डुलत चालतो
कंबरेत थोडा बाक

खुशीत आला की मारतो
लांब लांब उड्या
भीतीदायक चेहरा
मोठ्या नाकपुड्या

सांकेतिक भाषेचे
असते त्याला ज्ञान
स्वभावाने भावनिक
शांत व बुद्धीमान

दिसतो अक्राळविक्राळ
वाटते त्याची भीती
प्रेम त्याला दिल्यास
जपतो माणुसकीची नाती



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

## येरे येरे तू पावसा!

आता येईल पाऊस
आले दिस पेरणीची
सदा लागे चातकाला
आतुरता पावसाची . १

वाट पाहे बळीराजा
रोज रोज पावसाची
कधी येणार पाऊस
भिती वाटे दुष्काळाची. २

येत नसेल पाऊस
काय होईल शेतीची
कसे करू मशागत
आता काळ्या मातीची. ३

दिसे सर्वत्र भकास
शेतीवाडी डोंगरात
येरे येरे तू पावसा
रुसू नको दिनरात. ४

सदा वाटे मना भिती
काळ अवेळी कोपला
असा कसा तू रुसुनी
दूर जाऊन झोपला. ५

येरे लवकर राजा
बाप पाहतो नभाला
येरे पावसा पावसा
नको पळवू ढगाला. ६

बाप करे विनवणी
ऐक बाबा मेघराजा
सदा पुजतो शेतास
देतो ग्वाही बळीराजा. ७

**नागेश बोंतेवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

# "रस्ता-पूल नाही तर किमान पोहण्याचे तरी प्रशिक्षण द्या"



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यातील मौजे चितनरवाडी येथील रस्ता व ओढ्यावरील पूल बांधकामासाठी शासनाकडून दोन वर्षांपूर्वी मंजूर झालेला निधी अद्याप खर्च न झाल्याने गावाच्या रस्ता आणि पूलासाठी उलगुलान आंदोलन करणाऱ्या ग्रामस्थांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात उपरोधिक पद्धतीने तहसीलदारांना निवेदन सादर केले आहे. आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर गावकऱ्यांना पोहण्याचे प्रशिक्षण देण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गेल्या चार वर्षांपासून उलगुलान आंदोलनाद्वारे गावाच्या रस्ता पुल बांधकामासाठी सर्व ग्रामस्थ लोकशाही मार्गाने सातत्याने लढा देत आहेत. पावसाळ्यात गावालगतच्या ओढ्याला पूर येऊन परिसर जलमय होतो. ओढे-नाले दुथडी भरून वाहत असल्याने नागरिक, विद्यार्थी, महिला, शेतकरी व ज्येष्ठ नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागतो. रस्ता व पूल बांधकामासाठी निधी उपलब्ध असूनही संबंधित यंत्रणेकडून कामे सुरू करण्यात आलेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.मागील चार वर्षांपासून विविध शासकीय कार्यालयांकडे पाठपुरावा करूनही प्रश्न सुटलेला नसल्याने ग्रामस्थांनी प्रशासनाला उपरोधिक इशारा दिला आहे. रस्ते व पूल उपलब्ध करून देण्याऐवजी नागरिकांना मोफत पोहण्याचे प्रशिक्षण, लाईफ जॅकेट, दोरखंड व अन्य बचाव साहित्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.दरम्यान, ग्रामस्थांनी स्पष्ट केले की, त्यांची खरी मागणी पोहण्याचे प्रशिक्षण नसून मंजूर निधी तात्काळ खर्च करून रस्ता व पूल बांधकामाची कामे पूर्ण करावीत हीच आहे. अन्यथा पावसाळ्यात घडणाऱ्या कोणत्याही दुर्घटनेस संबंधित विभाग व प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.सदरील निवेदन विठ्ठल जाधव व समस्त ग्रामस्थ, चितनरवाडी यांच्या वतीने तहसीलदार, जिंतूर यांना सादर करण्यात आले. दोन आठवड्यात उत्तर न दिल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता परभणी यांच्या दालनात जवाब दो आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक
या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य
Sanitary Health Inspector
सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर
या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १४ जून २०२६

## प्रेसनोट

## कुणबी प्रमाणपत्रासाठी हेल्पलाईन

**बीड (भगवंत पाळवदे) :** मराठवाड्यातील मराठा समाजास मराठा - कुणबी, कुणबी - मराठा, कुणबी जात प्रमाणपत्र देण्याच्या अनुषंगाने मा. न्यायमूर्ती श्री. संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. सीबीसी-२०२५/प्र.क्र.१२९/मावक दि. ०२.०९.२०२५ अन्वये हैदराबाद गॅझेटिअर मधील नोंदी विचारात घेऊन मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना मराठा - कुणबी, कुणबी - मराठा, कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. त्यानुसार कुणबी जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र याबाबत नागरिकांना सहाय्य करण्यासाठी व इतर संलग्न बाबींवरील समस्या सोडविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे १०७७ हा हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करून देण्यात येत आहे.तरी बीड जिल्ह्यातील पात्र नागरिकांनी संबंधित उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयाकडे कुणबी प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत. तसेच त्याबाबत काही अडचणी असल्यास जिल्ह्याच्या १०७७ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.




# शक्तीपीठांचे नव्हे, ज्ञानपीठांचे महामार्ग उभारा!

एका देवापासून दुसऱ्या देवाकडे जाण्यासाठी रस्ते बांधण्यापेक्षा, एका विद्यार्थ्याला विद्यापीठापर्यंत पोहोचवणारा मार्ग तयार करणे हेच खरे राष्ट्रनिर्माण!_देशाच्या विकासाची व्याख्या नेमकी काय आहे?मोठमोठे सिमेंटचे रस्ते, भव्य मंदिरांची साखळी आणि धार्मिक पर्यटनासाठी उभारलेली पायाभूत सुविधा, की प्रत्येक मुलाच्या हातात पुस्तक आणि प्रत्येक गावात दर्जेदार शाळा...?आज अशी परिस्थिती निर्माण होत आहे की शक्तीपीठांना जोडणारे मार्ग तयार होत आहेत, पण ज्ञानपीठांकडे जाणारे मार्ग अनेक विद्यार्थ्यांसाठी अजूनही खडतर आहेत. ही केवळ वाहतुकीची समस्या नाही; ही देशाच्या प्राधान्यक्रमांची समस्या आहे.शिक्षण हा खर्च नसून गुंतवणूक आहे.* एखादा रस्ता काही किलोमीटरचा प्रवास कमी करू शकतो, पण एक चांगली शाळा, चांगले महाविद्यालय आणि विद्यापीठ पिढ्यानपिढ्या दारिद्र्याचा प्रवास संपवू शकते. त्यामुळे प्रश्न असा आहे की आपण भावी नागरिक घडवत आहोत की फक्त प्रवासी वाढवत आहोत?अनेक भागांत विद्यार्थी अजूनही दर्जेदार शिक्षण, शिक्षक, वाचनालय आणि प्रयोगशाळांसाठी संघर्ष करत आहेत. दुसरीकडे, धार्मिक पर्यटनाला चालना देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा उभ्या राहताना दिसतात. श्रद्धा प्रत्येकाची वैयक्तिक बाब आहे आणि ती जपलीच पाहिजे; परंतु राष्ट्राच्या भविष्यासाठी शिक्षणाला समान किंवा त्याहून अधिक प्राधान्य मिळणे आवश्यक आहे.आज उष्णतेच्या लाटा, पर्यावरणीय बदल आणि काँक्रीटीकरण यावरही गंभीर चर्चा सुरू आहे. विकास करताना पर्यावरण, शाश्वत नियोजन आणि मानवी जीवनाची गुणवत्ता यांचा विचार करणे तितकेच आवश्यक आहे. विकासाचा अर्थ फक्त सिमेंट आणि डांबर नसून, तो ज्ञान, आरोग्य, रोजगार आणि पर्यावरण यांचा समतोल आहे. महाराष्ट्रातीलप्रत्येक बंद पडणारी शाळा म्हणजे एका गावाचे भविष्य अंधुक होणे.* प्रत्येक रिकामे वाचनालय म्हणजे एका मुलाचे स्वप्न अर्धवट राहणे,आणि प्रत्येक शिक्षणापासून दूर गेलेला विद्यार्थी म्हणजे देशाच्या प्रगतीतील एक गमावलेली संधी,म्हणूनच आज समाजाने आणि धोरणकर्त्यांनी स्वतःला एक प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे—१. प्रत्येक गावात चांगली शाळा आहे का?२. प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण सहज उपलब्ध आहे का?३.प्रत्येक तरुणाला विद्यापीठापर्यंत पोहोचण्याची समान संधी आहे का?जर या प्रश्नांची उत्तरे "होय" नसतील, तर विकासाचा प्रवास अजून अपूर्ण आहे.देवाकडे जाण्याचा मार्ग श्रद्धा दाखवतो; पण ज्ञानाकडे जाणारा मार्ग भविष्य घडवतो.*शक्तीपीठांना जोडणारे रस्ते असू द्या, पण त्याहून अधिक महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याला ज्ञानपीठापर्यंत पोहोचवणारे मार्ग उभे राहिले पाहिजेत. कारण मंदिरे माणसाला अध्यात्म देतात, तर शिक्षण त्याला स्वाभिमान, रोजगार आणि समाजपरिवर्तनाची ताकद देते.राष्ट्राचे खरे वैभव दगडांच्या भव्य इमारतींमध्ये नसते; ते वर्गखोल्यांमध्ये बसलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वप्नांमध्ये असते.



**- प्रा डॉ राजेंद्र सोनवणे. जालना**

# उमरगा तालुक्यात ६६० विधवा व परित्यक्ता महिलांना बियाणे मदतीचा हात

**उमरगा :** येथील समाज विकास संस्था आणि नाम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पूर्ण मराठवाड्यामध्ये अनेक जिल्ह्यात अनेक तालुक्यात अनेक गावातील शेतकरी विधवा परित्यक्ता शेतकरी महिलांना विविध प्रकारचे बियाणाची मदत झालेली आहे.यामध्ये उमरगा तालुक्यातील विविध गावातून ६६० महिलांना बियाण्याचं वितरण करण्यात आलं याप्रसंगी इंजिनिअर किसान बाबरे साहेब अमेरिकेत वास्तव्यास असणारे जगदाळे साहेब, समाज विकास संस्थेचे कार्यवाह भूमिपुत्र वाघ, आणिक फायनान्शिअल सर्विसेस मधील कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते.. याप्रसंगी किसन बाबरे माजी इंजिनियर एम एस ई बी, कसगी गावचे सुपुत्र सध्या अमेरिकेत वास्तव्य असणारे गंगाधर जगदाळे, आदर्श गाव व्हताळ गावचे सरपंच यांनी सद्भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी शेती वाचली, शेती पिकली तर इथली समाज व्यवस्था शिस्तीत चालणार आहे. म्हणून इथल्या शेतकऱ्यांसाठी मदत पहिल्यांदा शेतीच्या बांधावर गेली पाहिजे. शेतकरी सुखावला तर समाज सुखावणार आहे. म्हणून सरकार, दानशूर लोक, स्वयंसेवी संस्था या सर्वांनी बळीराजाच्या पाठीशी उभारावं असे आवाहन सामाजिक क्षेत्रामध्ये विशेष कार्य केलेले जेष्ठ समाजसेवक भूमिपुत्र वाघ यांनी केले. या बियाणाच्या मदतीसाठी विविध गावातील विधवा, परित्यक्ता महिला सहभागी झाल्या होत्या. या कार्यक्रमाचे नियोजन विजय टाकळे, अफसाना मुल्ला, विद्या मारकड, गोविंद कामले, गणेश टाकळे, ज्ञानेश्वर पाटील, ज्योती राजपूत, सुमित भोसले, अनिल लवटे यांनी केले.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १४ जून २०२६


## परभणी पालकमंत्री मेघना दीदी बोर्डीकर यांच्या हस्ते जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन सोहळा संपन्न...




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** शहरातील प्रभाग क्र.12 नुरानी कॉलनी परिसरात भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक मोहम्मद अथर यांच्या भा ज पा जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटन सोहळा परभणी पालकमंत्री मा.मेघना दीदी साकोरे बोर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी पालकमंत्री मेघना दीदी यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत सांगितले की आपल्या वार्डात सकाळी फिरून नागरिकांच्या भेट घेऊन नागरिकांचे समस्या जाणून घेणे गरजेचे आहे तसेच जनसंपर्क कार्यालयात सर्वसामान्य नागरिका करिता स्वतः किंवा प्रतिनिधी बसविण्यात यावे. प्रभाग 12 च्या युवक नगरसेवकांनी कमी वयात राजकारणात प्रवेश केले व सर्वसामान्य नागरिकांचे काम करीत असल्याने पालकमंत्र्यांनी त्यांची प्रशंसा केली तसेच विधानसभा निवडणुकीत व नगरपरिषद निवडणुकीत जनतेला जे आश्वासने दिली आहे सर्वांची मदतीने पूर्ण करणार व शहरातील अनेक अडचणी आहे ते लवकरच सोडविण्यत येईल यावेळी पत्रकारांना संबोधित केले या भारतीय जनता पक्षाचे जनसंपर्क कार्यालय वार्ड क्र. १२ उद्घाटन सोहळ्यास साठी टीकाखान पठाण, मोहम्मद अथर,डॉ.पंडित दराडे, विलास भंडारी, मोहसीनखान पठाण, राजा वैष्णव, शिवाजी कदम बोर्डीकर, वजीर सर, मोहम्मद मझर, मुन्ना सर, शोएब जानीमिया, मिर्झा याहीयाबेग, संदीप लकडे,कल्याण देशमुख,बासुलाला पठाण,प्रदीप चौधरी,योगेश काशीकर, हाजीअझर, इद्रिस चाऊस, अशोक बुधवंत, समीर जानिमिया, मोहम्मद नूरभाई, आदी मान्यवरांची उपस्थित होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख शकील अहमद पत्रकार यांनी केले या कार्यक्रमास वार्डातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## मयत डॉक्टरांच्या नावावरील भूखंड व्यवहार प्रकरणात तत्कालीन तहसीलदार व मंडळ अधिकारी यांच्या निर्णय प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** शहरातील कथित वादग्रस्त भूखंड व्यवहार प्रकरणात आता तत्कालीन तहसीलदारांच्या निर्णय प्रक्रियेबाबत विविध प्रश्न उपस्थित होत आहेत. मयत डॉ. भास्करराव पुंजाजी वानखेडे यांच्या नावाने कथितरित्या बनावट व्यक्ती उभी करून खरेदीखत करण्यात आल्याचा आरोप असताना, फेरफार मंजुरीपूर्वी आवश्यक पडताळणी करण्यात आली होती का, याबाबत चर्चा सुरू आहे.मौजे जिंतूर येथील सर्वे नं. ११६/१/अ मधील जागेसंदर्भात खरेदीखत क्र. ६३५/२०२५ नंतर फेरफार क्र. १८६६५ मंजुरीची प्रक्रिया सुरू झाली होती. या प्रक्रियेदरम्यान आक्षेपदार मिर्झा खालेद बेग नूर बेग यांनी लेखी आक्षेप नोंदवत मूळ १९८९ च्या खरेदीखतातील डॉ. भास्करराव पुंजाजी वानखेडे आणि नव्या दस्तातील भास्कर पुंजाजी वानखेडे (वय ४४, व्यवसाय मजुरी) यांच्यातील विसंगती निदर्शनास आणून दिली होती.तलाठी कार्यालयाकडून सादर करण्यात आलेल्या अहवालातही काही बाबी नमूद असल्याचे बोलले जात आहे. अशा परिस्थितीत फेरफार मंजुरीपूर्वी संबंधित व्यक्तीची ओळख, वारसांची नोंद, आधार व इतर कागदपत्रांची पडताळणी तसेच मूळ दस्ताशी तुलना करण्यात आली होती का, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.दरम्यान, संबंधित भूखंडाची पुढे खरेदीखत क्र. १६०६/२०२५ द्वारे विक्री झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे महसूल विभाग, नोंदणी प्रक्रिया आणि फेरफार मंजुरीच्या कार्यपद्धतीबाबतही विविध स्तरांवर चर्चा रंगू लागली आहे.या प्रकरणी १८ मे २०२६ रोजी जिंतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, पोलीस तपासातून पुढे कोणती तथ्ये समोर येतात याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. तपास पूर्ण होईपर्यंत सर्व संबंधित बाबींची सत्यता अधिकृत चौकशी व तपासातूनच स्पष्ट होणार आहे.







## एसटी आगाराच्या नो पार्किंग झोनचे उल्लंघन वाहनावर कार्यवाही



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** :परिवहन मंत्री प्रताप सरनाईक व एस. टी.महामंडळाच्या मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी डॉ. नारनवरे मॅडम यांनी दिलेल्या निर्देशानुसार रा.प. परभणी विभागांमध्ये अवैध प्रवासी वाहतूक प्रतिबंधक विशेष कारवाई मोहीम राबविण्यात येत असून या अंतर्गत परभणी विभागाचे विभाग नियंत्रक यांनी परभणी विभागातील सर्व आगार व्यवस्थापक, सहायक वाहतूक अधीक्षक, वाहतूक निरीक्षक यांना त्यांच्या आगाराच्या अखत्यारीतील बस स्थानकाच्या 200 मीटर नो पार्किंग झोन मध्ये उभे राहून अवैध प्रवाशी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर स्थानिक पोलिसांच्या मदतीने कारवाई करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत तसेच विभागातील दक्षता पथकामार्फत विविध बस स्थानकावर जाऊन बस स्थानकाच्या 200 मीटर नो पार्किंग झोन ची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून पोलिसांच्या मदतीने नो पार्किंग झोन मध्ये उभे असलेल्या वाहनांवर धडक कारवाई करण्यात येत आहे. मागील दोन दिवसात सदर मोहिमेअंतर्गत पोलिसांच्या मदतीने 260 वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आलेली असून सदर मोहीम पुढील आठवडाभर राबवण्यात येणार असल्याची माहिती परभणी विभाग सुरक्षा दक्षता अधिकारी काळबांडे यांनी दिली आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १४ जून २०२६

# बाईचा दगड - समकालीन वास्तवाच्या भेदक कथा




डॉ भास्कर बडे दादा कथाकार, अस्सल कथा कथनकार.इमाने इतबारे शेती मातीशी कायम झुंजार कष्टवंत हात अन् तितक्याच जोरकसपणे कथा विश्व समृद्ध करणारा मराठवाड्यातील बोलीशैलीचा भाष्यकार भास्कर बडे.भारतमातेचा एक सच्चा पाईक म्हणून आजच्या समकालीन वास्तवाचे आपल्या सृजनशील कथा लेखनातून दमदार अभिव्यक्तीचे अधिष्ठान प्राप्त कथा म्हणजे 'बाईचा दगड'."शेतीत आख्खे कुटूंब झुंज देऊनही हात रिकामेच राहतात! तरीसुद्धा, शेतीत अन्न निर्माण करणाऱ्या लक्षावधी शेतकरी हातांना"हे मनोगत काळजा ठाव घेते.अरे मरायचं कशासाठी? अन् का म्हणून? आपण या भारतमातेचे सुपूत अहोत.'देशद्रोही'या कथेचा आत्मा भारतीय सैनिकाचा आहे.ज्यांनी भारतमातेच्या सुपुत्राचा खत्मा केला.आपले हजारो शुर सैनिक मारले.मगआपल्या ही सैनिकांनी उनग्यावर टाकून जाळले.जेल मध्ये नेतांना वाटेतच फायरिंग करून मारले."गंजीने पेट घेतला.त्या जाळात बाबूभाईचा देह राख-राख झाला.पहाटे-पहाटे वाहिन्यांवर कॅप्टनने माहिती पुरवली,"बाबूभाई जेल तोडून पळाला..(पृ.११)'आम्हाला हजार नवरे' शिक्षण संस्थेतील अनागोंदी कारभार,इथली गढूळ आणि भ्रष्ट व्यवस्थेचं राजकारण, डावपेच जातीपातीचे खळगुट भागीदार, म्हणून "कोर्ससाठी लागणारे शिक्षक फुकट मिळतात म्हणूनच काढतात.साहेब शिक्षणक्षेत्राला कीड लागू लागली.जरा औषध करा"(पृ.२८)'गुत्तं' उक्त,उधडं अशी आता कोणत्याही क्षेत्रात भूंमका निघाली.मोलमजूरी करून खाऊ पण हे शहरातलं गचपनी जगणं नको.गुत्तेदाराच्या हाताखाली राबराब राबायचं पोटाला पोटभर मिळना."आवं आपुन चहाचं दुकान टाकू? आपल्या गावाच्या मातीकडं चला.."(पृ.३८) संपतं गावाकडे चहाचं हा◌ॅटेल टाकतो.व सुखात जगतो.'कांबळे विरूद्ध कांबळे 'ही आजच्या वर्तमानाची अस्वस्थ वेदना देणारी कथा.शिक्षणाच्या बाजारातला प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षकांचा रेट ठरलेला.अमाप पैसा देऊन ही अप्रूलसाठी पुन्हा पैशाची मागणी.संस्थाचालक, पुन्हा आपल्याचं सग्यासोयरचं, नात्यागोत्याचं राजकरण करुन त्याचं खळगुट करुन घेणार पण कुणीतरी वरचढ भेटतोच.इतक्या दिवस फुकट काम केलं बिनपगारी घासलं तरीबी अप्रूल नाही काढलं म्हुणं या कथेतील नायक ""रेणापूरच्या शिक्षकांने, संस्थाचालकास भोसकले'.माझ्या तोंडून वाक्य पडले,'शिक्षणमहर्षीनो सावधान; शिक्षणाचा बाजार मांडू नकानाहीतर..."(पृ.४५)'खांदा' बापानं मुलाला अंगा खांद्यावर खेळवलं त्याचं मुलाला खांदा देण्याची वेळ यावी यासारखी वाईट गोष्ट नाही.ही एक हळवी पण वास्तव स्नेहाची किनार असलेली कथा.सासरा सुनेला निर्धाराच्या चार गोष्टी सांगतो.रडून नाहीतर लढून दाखवं.अशी ही ग्रामीण वास्तवाची कथा.'हिसका'ही दचका, देणारी कथा.म्हणजे 'भाषण नको राशन द्या.स्त्री पुरुष समानता जिंदाबाद,कमानेवाला खायेगा,लुटणेवाला जायेगा! भूकंप ग्रस्तांच्या वेदना हुंकार या कथेतून आला आहे.भूकंपग्रस्त भागात पाणी मिळावे म्हणून मोर्चा काढला तर जेल.इथे माणूसकीचे गहिवरले पण दिसून येते.'दारिद्री बाप' या कथेत बीएड करण्यासाठी शेत गहाण ठेवून.इंग्रजी विषय असूनही संस्थाचालकांनी वापरून घेतलं.बहिणीचे लग्न, पुढं दारुड्या मेव्हणा.नोकरीचे स्वप्न पाहत आख्खी जिंदगी बरबाद झाली पण मायबापाला सुख देता आलं नाही.पुढं लग्न अन् पोरं आणि मोडका संसार.ही कथा एक बाप मुलाला सांगतो.'पुनर्वसन' पुन्हा नव्याने घरबसवू.ही एक दलितवस्तीची गौतम कांबळेची कथा. अन्यायअ त्याचा रालावाच्या फोडलीचं पाहिजे.या जातीयवादी व्यवस्थेला चपराक बसली पाहिजे.ती वेगळ्याच अनुषंगाने.दलिताचे पुनर्वसन गौतम कांबळे करुन घेतो.'धुर्ळाळा' ही अस्वस्थता शिगेला पोहचवणारी कथा.कथेचा नायक अत्यंत धुर्त.एका धनाढ्य कारखानदार व शिक्षणसंस्थाचालकाला धडा शिकवतो.उस कारखान्याला घेऊन जात नाही म्हणून पेटून सारा धुर्ळाळा राजकीय करून टाकतो.अन् संस्थेत नोकरी मिळवितो"पोपटला देणगी न देता नोकरी मिळाली होती.सोनाबाईच्या तोंडून शब्द आले"संसारावरचा धुर्ळाळा गेला की र्ं पोरा!(पृ.८६)'मुकी वर्गणी' या समाज व्यवस्थेची अत्यंत सखेद वास्तव मांडणारी कथा कशाचीही वर्गणी अन् कशाचीही.मुकीचं ती तिला हाकना बुक शिक्षण संस्था,मंदिर,गणपती,अनेक ठिकाणी ही देणगी वर्गणी दिली जाते.पण एक आवाज या कथेतून येतो"योगानंद संस्थेच्या मुक्या वर्गणीला कंटाळून;शिक्षकांच्या पत्नी उपोषणाला बसणार....!याचा परिणाम असा झाला.वर्गणी बंद झाली..(पृ.९१)अशी खंमकी कथा 'बरं का मॅडम' एक सृजनशील कुणबाऊपणाचा अनुभव शिकल्या सवरल्या उच्च विभूषित म्हणवणाऱ्या बायका.मॅडम म्हणतात 'शेतकऱ्याची लय मजा असते'जेव्हा कथाकार सांगतो त्याला दोन पोरीची लग्न करायची.शेत पिकलं नाही म्हणून पोरीची लग्न थांबली.मग शेतीचे वाकायला काढणारा शेतकरी बाप.मुलीचं गळफास घेऊन आपलं आयुष्य संपवितात.तुमच्या मुलीच्या बाबतीत असं घडलं तर..ही कथा काळजाचा ठाव घेते आणि मन गहिवरून येते.शेतकऱ्याला नावं ठेवणारी रुमण्यानं ठेसून काढली पाहिजे.ती मॅडम शेतकऱ्यांना काहीतरी अनुदान मिळालं पाहिजे.अशी भाष्य करु लागते.'नकटी' अब्दुलनं दीशाचं नाक कापलं.गाव खेड्यातील एक सुंदर बाई जेव्हा तिचे चारित्र्य हाननं होते जणू तिचे नाव नाक कापल्या जाते.तरीही बाई ही सारा अपमान मातीत गाडून या स्त्रीत्वाच्या जगण्याला नवा आयाम देते.कारण हे सौंदर्य इश्वरी देणं आहे.आत्म्याचा हात करणे हे पाप आहे.हे राजकारण भंयकर डावपेच खेळते."दिशाचे नाव आता गावभर नकटी पडले होते.मात्र दिशाच्या मुलाला 'बाप'मिळाला नाही.तो असाच मोकाटपणे वाढू लागला.(पृ.१९६)'जनावर' हे एक रुपक.त्या रूपकात्मक कथेचा ढाचा म्हणजे आजची राजकीय सामाजिक आर्थिक परिस्थितीत ही जनावरच आहेत का?लांडगा, कोल्हा रानमांजर उंट,शेळी बोकड्या,उंदीर, वटवाघूळ, इथं आजची वास्तविकता मांडली आहे.अत्यंत सखेद वास्तवाचे रुपक.' नाऱ्या बहिणी खातो'बहिणीची शेती हडप करणारा.या व्यवस्थेत अनेक रघत पारखे इसम असतात.हा इसबगोल मानवी त्वचेला लागलेला भंयकर खाज्या रोग आहे.मग सख्या बहिणी टंटणीचा पाला चोळून मलम होऊन येतात.पण ज्यांना बहिणचंही खायला पुरत नसेल तर ही माणसंच नाही तर हावडी अन् सावडी आवल्याद आहे.अशी ही कथा.'मरणरात्र' ही अतिशय गंभीर ललित अनुबंधाची कथा आहे.:मी पाथर्डीला शिकायला होतो'बाईच्या खोलवर अंतरंगाचा वेध ही कथा घेते.तत्कालीन लेखकाने शिक्षणासाठी केलेला संघर्ष व बाईने कनवाळू मायेने दिलेले प्रेम म्हणजे ही वास्तव अनुभूती आहे.ओढ्या नदीच्या पुरातून पोहत येणे.बाळपणीच्या काळातली ती ओंजळभर सुखाची आणि दु:खाची कथा मन पिळवटून टाकते.'माय'ही कथा प्रतिनिधीक आजच्या पांढरपेशी शहरात नोकरीला लागलेल्या माय बापाच्या जीवावर.त्याच्या जीवनात एक पत्नी म्हणून जोडीदारीन येते अन् 'माय'नकोशी होते. त्याला मायेचा ओलावा टिकून ठेवायचा असतो.गावाची मायेची सावली ओंजळभर सुखाची मनतृप्ती देणारं सुख मिळावं जे लहानपणी मिळालं ही माय त्याचं मनाचं भरणपोषण करते."मह्या सूनाला वाईटवक्ट बोलायचं नाय.राजाराणीसारखं राहायचं..."(पृ.१५६)ही नाळ नात्याची तुटत चाललेली माय घट्ट बांधून देते.या कथासंग्रहाची शिर्षक कथा म्हणजे लेखकाच्या जगण्याचा सारं सार्थक्तेचा आहे.ज्या मायमातेच्या उदरातून जन्म झाला.तिची कृतज्ञता व ऋणाई म्हणजे ही कथा.माय आई अन् बाई हे मायचे रुप.आज सर्वव्यापी आम्ही शहराळलो.अवसापुनवाला गावाकडं जातो.तेव्हा आई बाई आठवते.ही एक आत्मकथनात्मक कथा.बाईनं मनतृप्त होईस्तोवर जेवू घातलेलं.आपल्या हितासाठी खाल्लेल्या खस्ता.लेक येणार म्हणून वाटाकडे लागले डोळे.त्याच्यासाठी सारं चिज वस्तूच भरुन ठेवणं.लेकं येणारं म्हणून बाईचं मन आभाळ एवढं व्हायचं.पण आज 'बाईचा दगड' वावराच्या धुऱ्यावर समाधी जवळ जाऊन बाईच्या दगडाचं दर्शन घेतो तेव्हा."रडत जाऊ नका.जिवाला जपा.लोक वाईट निघालीत" हे ऐकलं की पुन्हा डोळे भरतात.अश्रूचा पाऊस सूरू होतो.तेव्हा बाईच्या दाराकडे ओठ पुटपुटतात,"बाईss तुला न्यायला आलोय!चल ना!"(पृ.१६८) भास्कर बडे सरांच्या कथेचा आशय अत्यंत चिंतनाचा आहे.या कथेतील पात्र व त्यांची देहबोली ही मराठवाडी बोलीशैलीची असल्याने एक जबरदस्त कथात्मक्ता होऊन जाते."बाईचा दगड'हा कथाकार भास्कर बडे यांचा तिसरा कथासंग्रह!कथेचे विषय माणसाचे.तो माणूस कोणताही असो त्याच्यावर होणारा अन्याय-अत्याचारचे विषय कथेतून घेऊन त्यातून उत्तरे देणारी ही कथा.शिक्षणक्षेत्र असो की शेती! त्यातल्या नकोशा घटनांना कथेचे विषय बनवून अखेर माणूस महत्त्वाचा,हे सुत्र सांगणाऱ्या कथा डॉ बडे लिहितात.शेतीतील बदलते वास्तव मांडणारा हा ग्रामीण कथाकार दखलपात्र अशा 'नाऱ्या बहिणी खातो', बरं का मॅडम,नकटी,धुर्ळाळा, हिसका, आणि 'बाईचा दगड'या महत्वाच्या शेतीविषयक कथा लिहून जातो.ग्रामीण कथा मरगळ झटकून नवी कथा मराठी साहित्याला देत आहे.त्यात डॉ भास्कर बडे यांच्या 'बाईचा दगड'हा कथासंग्रह नक्कीच महत्वाचा आहे.(ब्लर्ब).या कथेचीकथन शैलीने ही अतिशय गंभीर विचारप्रवर्तक आहे.अरविंद शेलार यांचे मुखपृष्ठ आशय संपन्न झाले आहे.आदरणीय भास्कर बडे दादा मनस्वी हार्दिक शुभेच्छा.

**पुस्तक:-बाईचा दगड(कथासंग्रह)लेखक:- डॉ भास्कर बडे प्रकाशक:-घनश्याम पाटील 'चपराक प्रकाशन,पुणे मुखपृष्ठ:- अरविंद शेलार प्रथमावृती:-१२जानेवारी २०२१ किंमत:-१७०/रुपये संवाद:- ९९७५१३७३३७**



**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके,जालना**

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १४ जून २०२६

# रक्तदान : जीवनदानाची नवी दिशा- डॉ. राजेंद्र बगाटे



दि. १४ जून हा दिवस जगभरात 'जागतिक रक्तदाता दिन' म्हणून साजरा केला जातो. मानवतेच्या सेवेसाठी निःस्वार्थ भावनेने रक्तदान करणाऱ्या लाखो रक्तदात्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, सुरक्षित रक्ताच्या उपलब्धतेचे महत्त्व अधोरेखित करणे आणि अधिकाधिक लोकांना स्वेच्छेने व नियमितपणे रक्तदान करण्यासाठी प्रेरित करणे हा या दिवसामागील प्रमुख उद्देश आहे. आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती झाली असली, तरी मानवी रक्ताला पर्याय निर्माण करण्यात शास्त्रज्ञांना अद्याप यश आलेले नाही. त्यामुळे रक्ताची गरज भागविण्यासाठी रक्तदान हाच एकमेव आणि सर्वाधिक प्रभावी मार्ग आहे. प्रत्येक वर्षी अपघातग्रस्त रुग्ण, शस्त्रक्रियेसाठी दाखल असलेले रुग्ण, कर्करोगग्रस्त व्यक्ती, थॅलेसेमियाग्रस्त मुले, प्रसूतीदरम्यान गुंतागुंत निर्माण झालेल्या माता आणि विविध रक्तविकारांनी ग्रस्त रुग्ण यांच्या उपचारासाठी मोठ्या प्रमाणावर रक्ताची आवश्यकता भासते. अशा वेळी एखाद्या अनोळखी व्यक्तीने केलेले रक्तदान अनेक कुटुंबांसाठी आशेचा किरण ठरते.जागतिक रक्तदाता दिन साजरा करण्यामागे एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक संदर्भ आहे. १४ जून हा दिवस रक्तगटांचा शोध लावणारे ऑस्ट्रियन शास्त्रज्ञ कार्ल लँडस्टायनर यांच्या जन्मदिनानिमित्त निवडण्यात आला आहे. १९०१ मध्ये त्यांनी एबीओ (ABO) रक्तगट प्रणालीचा शोध लावला आणि वैद्यकीय क्षेत्रात क्रांती घडवून आणली. त्यांच्या या महत्त्वपूर्ण संशोधनामुळे सुरक्षित रक्तसंक्रमणाची प्रक्रिया विकसित झाली आणि लाखो लोकांचे प्राण वाचविणे शक्य झाले. त्यांच्या या योगदानाची दखल घेत त्यांना १९३० मध्ये वैद्यकशास्त्रातील नोबेल पुरस्काराने गौरविण्यात आले. २००४ पासून जागतिक आरोग्य संघटना, आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस संस्था आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटनांच्या पुढाकाराने जागतिक रक्तदाता दिन साजरा केला जाऊ लागला. २००५ मध्ये जागतिक आरोग्य सभेने या दिवसाला अधिकृत मान्यता दिली.रक्तदान ही केवळ वैद्यकीय गरज नसून सामाजिक जबाबदारी आहे. रक्तदान करणारी व्यक्ती आपल्या रक्ताचा उपयोग कोणासाठी होणार आहे हे जाणत नसते, तरीही ती कोणत्याही अपेक्षेशिवाय दुसऱ्याच्या जीवनासाठी मदतीचा हात पुढे करते. या निस्वार्थ कृतीमुळे रक्तदानाला मानवतेचे सर्वोच्च प्रतीक मानले जाते. रक्तदानामुळे केवळ एका व्यक्तीचे नव्हे तर अनेकांचे जीवन वाचविणे शक्य होते. रक्ताचे विविध घटक जसे की लाल रक्तपेशी, प्लेटलेट्स आणि प्लाझ्मा वेगवेगळे करून विविध रुग्णांच्या उपचारासाठी वापरले जातात. त्यामुळे एका रक्तदात्यामुळे तीन वेगवेगळ्या रुग्णांना जीवनदान मिळू शकते.भारतासारख्या मोठ्या लोकसंख्येच्या देशात रक्ताची मागणी प्रचंड आहे. दरवर्षी लाखो युनिट रक्ताची आवश्यकता भासते. आरोग्य सेवांचा विस्तार, वाढत्या शस्त्रक्रिया, रस्ते अपघातांचे प्रमाण, कर्करोगावरील उपचार आणि थॅलेसेमियासारख्या आजारांचे वाढते प्रमाण यामुळे रक्ताची गरज सातत्याने वाढत आहे. अनेक रक्तपेढ्या आणि स्वयंसेवी संस्था रक्तसंकलनासाठी प्रयत्नशील असल्या तरी अनेक वेळा रक्ताचा तुटवडा जाणवतो. विशेषतः दुर्गम ग्रामीण भागांमध्ये आणि दुर्मीळ रक्तगटांच्या बाबतीत ही समस्या अधिक तीव्र होते. त्यामुळे नियमित आणि स्वेच्छेने रक्तदान करणाऱ्या नागरिकांची संख्या वाढविणे अत्यंत आवश्यक आहे.रक्तदानाविषयी समाजात अनेक गैरसमज प्रचलित आहेत. रक्तदान केल्याने शरीर अशक्त होते, कायमस्वरूपी कमजोरी येते, रक्ताची कमतरता निर्माण होते किंवा महिलांनी रक्तदान करू नये अशा अनेक चुकीच्या समजुती लोकांमध्ये दिसून येतात. प्रत्यक्षात वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते निरोगी व्यक्तीने ठरावीक कालावधीनंतर रक्तदान करणे पूर्णपणे सुरक्षित असते. शरीरातील रक्तनिर्मितीची प्रक्रिया नैसर्गिकरित्या सुरू असते आणि रक्तदानानंतर काही दिवसांत शरीर हरवलेल्या रक्ताची भरपाई करते. रक्तदानासाठी वापरण्यात येणारी सर्व उपकरणे निर्जंतुक आणि एकदाच वापरण्यासाठी असतात. त्यामुळे संसर्गाचा धोका नसतो. त्यामुळे अंधश्रद्धा आणि गैरसमज बाजूला ठेवून वैज्ञानिक दृष्टिकोनातून रक्तदानाकडे पाहण्याची गरज आहे.रक्तदानासाठी काही निकष निश्चित करण्यात आलेले आहेत. साधारणतः १८ ते ६० वर्षे वयोगटातील, किमान ५० किलोग्रॅम वजन असलेली, आवश्यक हिमोग्लोबिन पातळी असलेली आणि वैद्यकीय तपासणीत पात्र ठरणारी व्यक्ती रक्तदान करू शकते. रक्तदानापूर्वी रक्तदात्याची आरोग्य तपासणी केली जाते. त्यात रक्तदाब, हिमोग्लोबिनचे प्रमाण आणि वैद्यकीय इतिहास यांची माहिती घेतली जाते. यामुळे रक्तदाता आणि रक्त घेणारा रुग्ण या दोघांचीही सुरक्षितता सुनिश्चित केली जाते.थॅलेसेमिया या आनुवंशिक रक्तविकाराने ग्रस्त असलेल्या मुलांच्या जीवनात रक्तदात्यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असते. या मुलांना नियमितपणे रक्त द्यावे लागते. जर वेळेवर रक्त उपलब्ध झाले नाही, तर त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे नियमित रक्तदान करणारे दाते या मुलांसाठी जणू जीवनदातेच ठरतात. त्याचप्रमाणे कर्करोगावरील उपचार घेत असलेल्या रुग्णांना, विशेषतः केमोथेरपीदरम्यान, प्लेटलेट्सची आवश्यकता भासू शकते. अशा परिस्थितीत प्लेटलेट्स दान करणाऱ्या व्यक्तींचे योगदानही अत्यंत मोलाचे असते.महिलांच्या रक्तदानाबाबत समाजात अनेक गैरसमज असल्याने महिलांचा सहभाग तुलनेने कमी दिसून येतो. प्रत्यक्षात आवश्यक वैद्यकीय निकष पूर्ण करणाऱ्या महिला सुरक्षितपणे रक्तदान करू शकतात. महिलांनी रक्तदान केल्यास समाजात सकारात्मक संदेश जातो आणि इतर महिलांनाही प्रेरणा मिळते. महिलांचा सहभाग वाढल्यास रक्तदान चळवळ अधिक व्यापक आणि प्रभावी होऊ शकते.युवक ही देशाची सर्वात मोठी ताकद आहे. रक्तदान चळवळीत युवकांचा सहभाग वाढविणे ही काळाची गरज आहे. महाविद्यालयीन स्तरावर रक्तदान शिबिरे आयोजित करून विद्यार्थ्यांना रक्तदानाचे महत्त्व पटवून दिल्यास त्यांच्यामध्ये सामाजिक जबाबदारीची भावना विकसित होऊ शकते. राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना आणि विविध युवक संघटनांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रक्तदान मोहिमा राबविता येऊ शकतात.ग्रामीण भागात रक्तदानाबाबत जनजागृती करणेही अत्यंत आवश्यक आहे. अनेक ग्रामीण भागांमध्ये रक्तदानाविषयी अज्ञान, भीती आणि अंधश्रद्धा आढळून येतात. काही लोकांना रक्तदानामुळे आयुष्य कमी होते किंवा शरीरावर विपरीत परिणाम होतात, असे वाटते. या गैरसमजुती दूर करण्यासाठी आरोग्य विभाग, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक नेतृत्व यांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. गावपातळीवर आरोग्य शिबिरे, प्रबोधन कार्यक्रम आणि रक्तदान शिबिरांचे आयोजन करून लोकांमध्ये विश्वास निर्माण करता येऊ शकतो.कोविड-१९ महामारीच्या काळात रक्तदानाचे महत्त्व नव्याने अधोरेखित झाले. लॉकडाऊन आणि हालचालींवरील निर्बंधांमुळे अनेक रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा तुटवडा निर्माण झाला होता. अशा कठीण काळात अनेक स्वयंसेवी संस्था, युवक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन रक्तदान केले. या अनुभवातून नियमित रक्तदात्यांचे महत्त्व अधोरेखित झाले. संकटाच्या काळातही समाजासाठी पुढे येणाऱ्या अशा रक्तदात्यांचे योगदान निश्चितच प्रेरणादायी आहे.भारतीय संस्कृतीमध्ये दानधर्माला विशेष महत्त्व दिले गेले आहे. अन्नदान, विद्यादान, वस्त्रदान यांसारख्या विविध दानप्रकारांमध्ये रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. कारण रक्तदानामुळे एखाद्या व्यक्तीला थेट जीवनदान मिळते. हे दान आर्थिक परिस्थितीवर अवलंबून नसते. प्रत्येक निरोगी व्यक्ती आपल्या इच्छाशक्तीच्या बळावर रक्तदान करू शकते. म्हणूनच रक्तदान हे खऱ्या अर्थाने मानवतेचे दान आहे.जागतिक रक्तदाता दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. रक्तदान शिबिरे, जनजागृती रॅली, व्याख्याने, पोस्टर स्पर्धा आणि रक्तदात्यांचा सत्कार अशा उपक्रमांच्या माध्यमातून समाजात रक्तदानाचे महत्त्व पोहोचविण्याचा प्रयत्न केला जातो. अनेक रक्तपेढ्या नियमित रक्तदात्यांचा गौरव करतात. हे केवळ त्यांच्या कार्याचा सन्मान नसून इतरांसाठी प्रेरणेचा स्रोत ठरते.आजच्या डिजिटल युगात रक्तदानासाठी तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. मोबाईल ॲप्स, सामाजिक माध्यमे आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून रक्तदात्यांची माहिती सहज उपलब्ध होते. आपत्कालीन परिस्थितीत आवश्यक रक्तगटाच्या दात्यांशी त्वरित संपर्क साधता येतो. त्यामुळे रक्ताची गरज असलेल्या रुग्णांना वेळेत मदत मिळण्यास मोठी मदत होते.शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षणात रक्तदानाविषयी माहिती दिल्यास भावी पिढी अधिक संवेदनशील बनू शकते. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना विकसित करणे आवश्यक आहे. रक्तदानाचा संदेश केवळ घोषणांपुरता मर्यादित न राहता जीवनमूल्यांचा भाग बनला पाहिजे. घरातील ज्येष्ठांनी आणि समाजातील आदर्श व्यक्तींनी रक्तदान करून तरुण पिढीसमोर उदाहरण निर्माण करणे आवश्यक आहे.रक्तदान ही मानवतेची सर्वात सुंदर अभिव्यक्ती आहे. रक्ताचा रंग सर्वांचा सारखाच असतो. जात, धर्म, भाषा, प्रदेश आणि आर्थिक स्तर यांच्यापलीकडे जाऊन रक्तदान माणसाला माणसाशी जोडते. एखाद्या अनोळखी व्यक्तीसाठी केलेले रक्तदान समाजात बंधुभाव आणि सहकार्याची भावना दृढ करते. त्यामुळे रक्तदान ही केवळ वैद्यकीय प्रक्रिया नसून सामाजिक एकात्मतेचे प्रतीक आहे.आजच्या धकाधकीच्या जीवनात अनेकदा आपण स्वतःच्या समस्यांमध्ये इतके गुंतून जातो की इतरांच्या वेदना समजून घेण्याची संवेदनशीलता कमी होत जाते. अशा वेळी रक्तदानासारख्या उपक्रमांमुळे समाजात परस्पर सहकार्याची भावना निर्माण होते. एखाद्याच्या जीवनात आनंद परत आणण्याचे सामर्थ्य आपल्या काही मिनिटांच्या वेळेत आणि थोड्याशा इच्छाशक्तीत दडलेले आहे, ही जाणीव रक्तदानामुळे होते.जागतिक रक्तदाता दिन हा केवळ औपचारिकता म्हणून साजरा करण्याचा दिवस नाही. तो आत्मपरीक्षण करण्याची संधी आहे. आपण रक्तदान करू शकतो का, आपल्या कुटुंबीयांना आणि मित्रांना रक्तदानासाठी प्रेरित करू शकतो का, आपल्या परिसरात रक्तदान शिबिरे आयोजित करण्यासाठी पुढाकार घेऊ शकतो का, याचा विचार करण्याची ही वेळ आहे. प्रत्येक निरोगी व्यक्तीने नियमित रक्तदानाचा संकल्प केला, तर देशातील रक्तटंचाईची समस्या मोठ्या प्रमाणावर कमी होऊ शकते.रक्तदानामुळे वाचलेल्या व्यक्तींच्या जीवनकथा अनेकदा प्रेरणादायी असतात. अपघातातून बचावलेले युवक, प्रसूतीदरम्यान जीवनदान मिळालेल्या माता, नियमित रक्तसंक्रमणामुळे शिक्षण पूर्ण करणारी थॅलेसेमियाग्रस्त मुले आणि कर्करोगावर मात करणारे रुग्ण या सर्वांच्या आयुष्यात रक्तदात्यांचे योगदान अमूल्य असते. अशा कथा समाजाला अधिक संवेदनशील बनवितात आणि रक्तदानासाठी प्रेरणा देतात. प्रत्येक निरोगी नागरिकाने वर्षातून किमान एकदा तरी रक्तदान करण्याचा निर्धार केला, तर देशातील लाखो रुग्णांना वेळेत उपचार मिळू शकतील. रक्तदानासाठी केवळ चांगल्या आरोग्याची आणि सकारात्मक दृष्टिकोनाची आवश्यकता असते. आपल्या काही क्षणांच्या योगदानामुळे एखाद्याच्या आयुष्यात अनेक वर्षांची भर पडू शकते.१४ जून रोजी जागतिक रक्तदाता दिन साजरा करताना आपण सर्वांनी रक्तदानाचा संदेश अधिक व्यापक करण्याचा संकल्प करायला हवा. समाजातील भीती, अंधश्रद्धा आणि गैरसमज दूर करून स्वेच्छा आणि नियमित रक्तदानाची संस्कृती विकसित करणे आवश्यक आहे. सुरक्षित रक्ताची उपलब्धता ही प्रत्येक रुग्णाचा मूलभूत अधिकार आहे आणि हा अधिकार सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक नागरिकाचे योगदान महत्त्वाचे आहे.मानवतेचे खरे सौंदर्य दुसऱ्यांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करण्यात आहे. रक्तदान ही अशीच एक कृती आहे जी कोणत्याही अपेक्षेशिवाय दुसऱ्याला नवजीवन देण्याची संधी देते. रक्ताचा प्रत्येक थेंब मौल्यवान आहे आणि प्रत्येक रक्तदाता समाजासाठी प्रेरणादायी आहे. या जागतिक रक्तदाता दिनानिमित्त आपण सर्वांनी एक पाऊल पुढे टाकूया, रक्तदानाचा संकल्प करूया आणि "रक्तदान हेच जीवनदान" हा संदेश कृतीतून सिद्ध करूया. कारण एखाद्याच्या शिरांमधून वाहणारे आपले रक्त केवळ त्याचे जीवन वाचवत नाही, तर संपूर्ण मानवजातीतील परस्पर सहकार्य, करुणा आणि माणुसकीच्या भावनांना अधिक दृढ करते. रक्तदान करूया, जीवन वाचवूया आणि मानवतेचा हा महान उत्सव अधिक व्यापक बनवूया.



**डॉ. राजेंद्र बगाटे (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत), ईमेल - bagate.rajendra5@gmail.com**